विकास वॉटरप्रुफिंग
घर व बंगला गळतीपासून
राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे
नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरेंटीने
लिकेच थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

।।श्री राम समर्थ।।
।।श्री नागनाथ प्रसन्न।।
महेश गायकवाड
मो. ९७६७०४०८४३
७७४१०८४५४५
श्री शारदा रोपवाटिका
टोमॅटो, मिरची, वांगी, झेंडू, कलिंगड, खरबूज, कोबी, फ्लॉवर,
शिमला मिरची, ऊस-८६०३२, २६५, पपई (७८६),पपई आइस बेरी इ.
आमच्याकडे वरील सर्व जातीची ट्रे मधील व गादी वाफ्यावरील दर्जेदार रोपे तसेच
ग्रॅण्ड-जी ९ केळी रोपे शोभेची झाडे योग्य दरात मिळतील.
सोलापूर-पुणे रोडवर, मोहोळ, कृषी विज्ञान केंद्राच्या पाठीमागे, मोहोळ.

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २५१ वा | शुक्रवार, दि. १५ मे २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# सोलापूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी एक लाख कोटीच्या निधीतून रस्त्यांचे जाळे निर्माण करणार- मंत्री नितीन गडकरी

## अक्कलकोट येथे 2784 कोटीच्या निधीतून सहा कामांचे डिजिटल भूमिपूजन

## सोलापूर शहराच्या पर्यायी वाहतुकीसाठी 33 किलोमीटरच्या रिंग रोड साठी 550 कोटीचा निधी मंजूर

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या माध्यमातून सोलापूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी एक लाख कोटीच्या निधीतून पुढील तीन वर्षात रस्त्यांचे जाळे निर्माण करण्यात येणार असल्याची ग्वाही केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिली.

अक्कलकोट येथे आयोजित सोलापूर जिल्ह्यातील सहा प्रकल्पाचे भूमिपूजन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते डिजिटल पद्धतीने करण्यात आले. यावेळी ते मार्गदर्शन करत होते. या कार्यक्रमास कर्नाटक राज्याचे नियोजन व धोरण आयोगाचे उपाध्यक्ष बी. आर. पाटील, सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य, राज्यसभा खासदार ज्योती वाघमारे, सोलापूर लोकसभा खासदार प्रणिती शिंदे, आमदार सर्वश्री सुभाष देशमुख, विजयकुमार देशमुख, सचिन कल्याणशेट्टी, समाधान आवताडे, देवेंद्र कोठे, राजू खरे, महापौर विनायक कोंड्याल, राष्ट्रीय महामार्ग चे सचिव एस.जी. शेलार, राष्ट्रीय महामार्ग मुंबईचे विभागीय अधिकारी प्रशांत फेगडे, तांत्रिक सल्लागार संजय जयस्वाल आदी उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सोलापूर जिल्ह्यातील विकासकामांचा आढावा घेतला. त्यांनी सांगितले की 2014 पर्यंत जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गाची लांबी 565 किमी होती, ती आता 1750 किमीपर्यंत वाढली आहे. त्यावेळी 52 हजार कोटी रुपयांच्या कामांचे भूमिपूजन झाले होते, त्यापैकी सोलापूर शहरातील उड्डाणपुलाचे काम वगळले तर सर्व कामे पूर्ण केल्याचे सांगून पुढील तीन वर्षाच्या काळात सोलापूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी एक लाख कोटीच्या निधीतून रस्ते विकासाची कामे मोठ्या प्रमाणावर घेऊन ते पूर्ण करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

यामध्ये जुना पुना नाका ते बोरामणी नाका रस्त्यासाठी 1020 कोटी, अहमदनगर सोलापूर कर्नाटक बॉर्डर पर्यंतच्या रस्त्यासाठी दहा हजार कोटी, राष्ट्रीय महामार्ग 65 वरील कामासाठी 48 कोटी, मुळेगाव येथील रस्त्यासाठी 35 कोटी अशा पद्धतीने रस्ते विकासाची कामे हाती घेतली जाणार आहेत. सुरत चेन्नई हा महामार्ग सोलापूर जिल्ह्याचे चित्र बदलणारे ठरेल. सोलापूर जिल्ह्यातील विविध महामार्गाच कामामुळे सोलापूर जिल्हा देशाच्या मध्यभागी येऊन





देशाचा लॉजिस्टिक हब बनेल असेही केंद्रीय मंत्री श्री. गडकरी यांनी यावेळी सांगितले.

श्री. गडकरी यांनी बुद्ध सर्किट हा 22 हजार कोटींचा प्रकल्प पूर्ण झाल्याचे सांगितले. बोधिवृक्षाखाली मिळालेला अनुभव त्यांनी भावनिक शब्दांत मांडला. तसेच 12 हजर कोटींचा पालखी मार्ग 80% पूर्ण झाला असून मार्गावरील 46 तलाव बांधले गेले आहेत. शेती व जलसंवर्धनाबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, सोलर पंप व ड्रिप सिंचनामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट होऊ शकते. पंढरपूर रिंग रोड, सोलापूर रिंग रोड, अक्कलकोट-दुधनी रस्ता यांसारख्या कामांना तसेच लोकप्रतिनिधी यांनी उपस्थित केलेल्या सर्व कामांना मंजुरी दिल्याचे त्यांनी जाहीर केले. विकासकामांमध्ये राजकारण न करता सर्व समाजघटकांना समान लाभ मिळावा, हा त्यांचा उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी आज भूमिपूजन होत असलेल्या सहा महामार्गामुळे अक्कलकोट येथे येणाऱ्या राज्याच्या विविध भागातील भक्तांना चांगल्या प्रवासाचा अनुभव मिळणार आहे. तसेच अक्कलकोट विधानसभा मतदारसंघात रस्त्याचे जाळे निर्माण झाल्याने या भागातील विकासाला मोठ्या प्रमाणावर चालना मिळेल असे त्यांनी सांगितले. त्याप्रमाणेच अक्कलकोट गाणगापूर, मोहोळ ते वळसंग सोलापूर शहरात साठी रिंग रोड मंजूर करण्याची मागणी त्यांनी यावेळी केली. खासदार प्रणिती शिंदे यांनीही आपले मनोगत यावेळी व्यक्त केले.

**भूमिपूजन होणारे प्रकल्प पुढीलप्रमाणे :**

- हसापूर ते बद्दाड किलोमीटरच्या रस्त्यासाठी पंधराशे 52 कोटीचा निधी.
- वागदरी - अक्कलकोट - तोळणूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 548 बी चे पेव्हड शोल्डरसहित दुपदरीकरण रस्त्याची लांबी 47.66 कि.मी. असून प्रकल्प खर्च 353 कोटी रुपये आहे.
- मोहोळ - बसवनगर - वळसंग राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 465 चे पेव्हड शोल्डरसहित दुपदरीकरण रस्त्याची लांबी 82.00 कि.मी. असून प्रकल्प खर्च 756 कोटी रुपये आहे.
- दुधनी येथे रेल्वे उड्डाण पूल बांधकाम तसेच रा.म.क्र. 150 ई च्या उर्वरित 4.122 कि.मी. रस्त्याचे उन्नतीकरण व दर्जोन्नतीकरण करण्यात येणार असून प्रकल्प खर्च 97 कोटी रुपये आहे.
- रा.म.क्र. 150 ई अंतर्गत बोरी उमरगे येथे बोरी नदीवर मोठ्या पुलाचे बांधकाम करण्यात येणार असून लांबी 0.75 कि.मी. असून प्रकल्प खर्च 26 कोटी रुपये आहे.
- या सर्व प्रकल्पांची एकूण लांबी 171 कि.मी. असून एकूण प्रकल्प किंमत2784 कोटी रुपये आहे. या विकासकामांमुळे सोलापूर जिल्ह्यातील दळणवळण व्यवस्था अधिक सक्षम होऊन नागरिकांना सुरक्षित व जलद प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे.

**या प्रकल्पाचे फायदे...**

प्रस्तुत पॅकेज सुरत चेन्नई ग्रीन फील्ड कॉरिडॉरचा एक भाग आहे. यामुळे 390 किलोमीटर आणि सहा तासाच्या प्रवासाच्या वेळेचे बचत होणार आहे. वन्यजीव संरक्षण उपायोजनामुळे प्राण्यांच्या सुरक्षित प्रवासाची खात्री होईल. अक्कलकोट आणि गाणगापूर या तीर्थक्षेत्रापर्यंत पोहोचणे सुलभ होणार आहे. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 465 ह एक भाग सोलापूर साठी अतिरिक्त रिंग रोड म्हणून काम करेल. वाहतूक कोडी प्रवासाचा वेळ आणि इंधनाचा वापर कमी होईल. सोलापूर जिल्ह्यात कृषी पर्यटन उद्योग आणि रोजगार निर्मितीला यामुळे चालना मिळणार आहे.

प्रारंभी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी व व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमास सुरुवात झाली. त्यानंतर श्री गडकरी यांच्या हस्ते डिजिटल पद्धतीने सहा महामार्गाच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महामार्ग प्राधिकरणचे सचिव एस.जी. शेलार यांनी करून रस्ते वाहतूक व महामार्ग प्राधिकरण मार्फत सोलापूर जिल्ह्यात सुरू असलेल्या विविध कामांची तसेच आज भूमिपूजन होत असलेल्या सहा कामांची माहिती दिली. मुंबईतील महामार्ग प्राधिकरण चे आर्थिक सल्लागार संजय जयस्वाल यांनी आभार मानले.

## विश्वकल्याण आणि धनसमृद्धीसाठी सोलापुरात 'ऐश्वर्य लक्ष्मी सुवर्ण कुबेर महोत्सवा'चे आयोजन

### २२ ते २४ मे दरम्यान धार्मिक कार्यक्रमांची मेजवानी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विश्वकल्याण, ऐश्वर्य आणि धनसमृद्धीचा संदेश देणाऱ्या श्री ऐश्वर्य लक्ष्मी सुवर्ण कुबेर महोत्सवाचे आयोजन श्री शक्ती सेवा समिती, सोलापूर यांच्या वतीने करण्यात आले असून, हा भव्य धार्मिक महोत्सव दि. २२ ते २४ मे २०२६ या कालावधीत अक्कलकोट रोड एमआयडीसी येथील महालक्ष्मी बँक्वेट हॉल येथे पार पडणार आहे. अशी माहिती समितीच्या अध्यक्षा वैशाली गाजूल यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या तीन दिवसीय महोत्सवात विविध धार्मिक आणि आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, भाविकांना भक्ती, श्रद्धा आणि अध्यात्माचा अनोखा संगम अनुभवण्याची संधी मिळणार आहे. महोत्सवात श्री ऐश्वर्य लक्ष्मी सुवर्ण कुबेर होम, श्री चित्रलेखा समेत कुबेर कल्याण व पट्टाभिषेक तसेच सौभाग्य लक्ष्मी पूजेचे आयोजन करण्यात आले



आहे. विशेष म्हणजे, परम पूज्य माताजी श्री श्री श्री रम्यानंद भारती स्वामिनीजी यांच्या सान्निध्यात हा महोत्सव पार पडणार असल्याने भाविकांमध्ये मोठे आकर्षण निर्माण झाले आहे.

महोत्सवादरम्यान गुरूपाद पूजा, मंत्रोपदेश, पूज्य माताजींचे अनुग्रह भाषण यांसह विविध धार्मिक विधी संपन्न होणार आहेत. तसेच दररोज दुपारी आणि सायंकाळी उपस्थित भक्तांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. सर्व कार्यक्रमांची सुरुवात सकाळी ९.३० वाजता होणार असून, तीन दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांनी परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून जाणार आहे.

श्री शक्ती सेवा समितीच्या वतीने सोलापूर शहर व परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ९०७५३३४९०२, ७८९२०८८२३४, ९०२१५६७५६८ आणि ९९२१७२७४५० या क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.


या पत्रकार परिषदेला उमेश गाजूल, डॉ. सनतकुमार अनुमल्ला, तेजस्विनी इराबत्ती आदी मान्यवर उपस्थित होते.

## ३१ ऑगस्टपर्यंत उजनीतील पाणी राखीव ठेवण्याचे आदेश

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** यंदाच्या पावसाळ्यावर एल निनोचा प्रभाव पडण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केल्याने उजनी धरणातील पाण्याचे काटेकोर नियोजन करण्याच्या सूचना पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिल्या आहेत.

३१ ऑगस्टपर्यंत जेवढे पाणी पुरेल तेवढे राखीव ठेवून सिंचनाची व्यवस्था करावी, असे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले.

सोमवारी नियोजन भवन येथे टंचाई आढावा बैठक पार पडली. बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना जयकुमार गोरे यांनी ही माहिती दिली. सध्या सोलापूर जिल्ह्यात सात टँकर सुरू असून टँकर मंजुरीचे अधिकार प्रांताधिकाऱ्यांना देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.



टँकरची मागणी प्राप्त झाल्यानंतर ४८ तासांच्या आत संबंधित गावात टँकर सुरू करण्याचे आदेश देण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

दुष्काळाची संभाव्य परिस्थिती लक्षात घेऊन कृषी विभागाने 'एल निनो सुरक्षा कवच पंचसूत्री' राबवावी, असे आवाहनही त्यांनी केले. या मोहिमेत पीक नियोजन, पाणी व्यवस्थापन, कीड व रोग नियंत्रण, पावसातील खंडाचे व्यवस्थापन आणि जोखीम व्यवस्थापन यांसारख्या विषयांबाबत शेतकरी व नागरिकांमध्ये जनजागृती केली जाणार आहे.

दरम्यान, कृषी निविष्ठांबाबत शेतकऱ्यांना सहज तक्रार नोंदवता यावी यासाठी जिल्हाधिकारी यांच्या संकल्पनेतून विशेष QR कोड प्रणाली विकसित करण्यात आली आहे. हा QR कोड प्रत्येक ग्रामपंचायत कृषी सहाय्यक कार्यालयात उपलब्ध करून दिला जाणार आहे.

या माध्यमातून शेतकरी थेट तक्रार नोंदवू शकतील आणि संबंधित तक्रारींचे जास्तीत जास्त सात दिवसांत निवारण केले जाईल. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे आणि अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत या QR कोड आधारित तक्रार निवारण प्रणालीचे उद्घाटन करण्यात आले.

## राज्यात नवीन ऑटोरिक्षा परमीट बंद; सोलापुरात जुन्या परमीटला लाखोंची किंमत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्याच्या परिवहन विभागाने ९ मार्च २०२६ पासून नवीन ऑटोरिक्षांचे खुले परमीट बंद केले. दुसरीकडे, नवीन इलेक्ट्रिक रिक्षांच्या नोंदणीवर कोणतेही निर्बंध नाहीत. इलेक्ट्रिक रिक्षा घेणाऱ्याकडे लायसन्स, प्रवासी वाहतुकीचा बॅच आणि पोलिसांचे चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र आवश्यक आहे.

त्यासोबत वितरक किंवा परवानाधारक ड्रायव्हिंग स्कूलकडून १० दिवसांचे प्रशिक्षण घेतल्याचे प्रमाणपत्र देखील बंधनकारक आहे.

सोलापूर व अकलूज आरटीओ शाखेकडील नोंदीनुसार सोलापूर जिल्ह्यात ४० हजारांपर्यंत रिक्षा रस्त्यावर धावत आहेत. तरीसुद्धा, दरमहा सोलापूर जिल्ह्यात विशेषतः शहरात सरासरी ५० रिक्षा वाढत होत्या. वाढत्या रिक्षांमुळे शहरामध्ये वाहतूक कोंडी व प्रदूषणाच्या समस्या दिवसेंदिवस गंभीर होत होत्या. या पार्श्वभूमीवर ९ मार्चपासून ऑटोरिक्षांचे खुले परमीट बंद करण्यात आले. तत्पूर्वी, ज्यांनी नवीन रिक्षा खरेदीसाठी इरादा पत्र केले आहे, त्यांना १८० दिवसांच्या मुदतीत परमीटसह नवीन रिक्षा घेता येईल.

आता ऑटोरिक्षा व इलेक्ट्रिक रिक्षांसाठी एकच नियमावली असावी म्हणून इलेक्ट्रिक रिक्षासाठी देखील 'आरटीओ'चा परवाना बंधनकारक केला जाणार असल्याचे सूत्रांनी सांगितले. यासंदर्भातील शासन आदेश अजून निघालेला नाही. तूर्तास, १३ मार्च २०२६ रोजी 'परिवहन'ने काढलेल्या पत्रानुसार इलेक्ट्रिक रिक्षा घेणाऱ्याकडून आवश्यक कागदपत्रे घेऊन त्यांना परवाना दिला जात आहे.



**१० हजारांचे जुने परमीट एक लाखाला**

राज्य सरकारने ९ मार्च २०२६ पासून नवीन ऑटोरिक्षांचे खुले परमीट देण्यास तात्पुरती स्थगिती दिली. सोलापूर शहर-जिल्ह्यात दरमहा ७२ ते ८० रिक्षा वाढत होत्या. परंतु, परमीट बंदमुळे रिक्षांची नोंदणी थांबली आहे. आता जुन्या रिक्षावाल्यांकडून परमीट विकत घेऊन नवीन रिक्षांवर चढविण्याचे प्रमाण वाढत आहे. नवीन परमीटसाठी परिवहन विभागाचे १० हजार रुपयांचे शुल्क होते, पण परमीट बंद झाल्याने नवीन रिक्षावाले जुन्या रिक्षा चालकांकडील परमीट विकत घेत आहेत. त्यासाठी ७५ हजार ते एक लाख रुपये मोजत आहेत. ज्या परिसरातील रिक्षाचे परमीट विकत घेतले, त्याच तालुक्यात, जिल्ह्यातील नवीन रिक्षावर ते चढविता येते, असा नियम आहे.

## 'नीट'च्या विद्यार्थ्यांमध्ये संतापाचे वातावरण




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** देशभरातील वैद्यकीय शिक्षणासाठी महत्त्वाची मानली जाणारी पेपरफुटीच्या गंभीर प्रकरणामुळे झालेली नीटची परीक्षा रद्द करण्यात आल्याने सोलापूरसह मोहोळ ग्रामीणमधील विद्यार्थ्यांमध्ये संताप आणि नैराश्याचे वातावरण निर्माण झाले आहे.

केंद्र सरकार व संबंधित परीक्षा यंत्रणांच्या निष्काळजीपणामुळे विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ झाल्याची तीव्र प्रतिक्रिया जनमानसात उमटत आहे.

सोलापूर जिल्ह्यातील अनेक विद्यार्थ्यांनी परिश्रमपूर्व मोठ्या तयारीने नीटची परीक्षा दिली होती. आपले स्वप्न पूर्ण होणार, अशी आशा सर्वांना होती. परीक्षेपूर्वीच प्रश्नपत्रिका सोशल मीडियावर व्हायरल झाल्याच्या तक्रारी समोर आल्यानंतर या प्रकरणाची चौकशी सुरू करण्यात आली. प्राथमिक तपासात काही ठिकाणी गैरप्रकार झाल्याचे स्पष्ट झाल्याने परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र, यामुळे प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या गोरगरीब, सामान्य शेतकरी, शेतमजूर व कामगारांच्या लाखो गुणवंत विद्यार्थ्यांना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. विद्यार्थी आणि पालकांनी सरकारच्या परीक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. वर्षभर कठोर मेहनत करूनही काही मोजक्या गैरप्रकार करणाऱ्यांमुळे संपूर्ण परीक्षा रद्द होणे अन्यायकारक आहे, अशी भावना विद्यार्थ्यांमधून व्यक्त होत आहे.

परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता आणि सुरक्षितता राखण्यात प्रशासन पूर्णपणे अपयशी ठरल्याचा आरोप करण्यात येत आहे. असे प्रकार वारंवार घडत आहेत. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याची मागणी जोर धरत आहे.

## पालकमंत्री गोरे यांना खा.प्रणिती शिंदे यांची अब्रुनुकसानीची कायदेशीर नोटीस

### ॲड. असीम सरोदे यांनी पाठविली जयकुमार गोरे यांना कायदेशीर नोटीस

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** खासदार प्रणिती शिंदे यांचे सातत्याने चारित्र्यहनन करणे, अपमानास्पद, बदनामीकारक आणि आक्षेपार्ह भाषेचा वापर करणे, मानहानीकारक विधाने करणे आणि स्त्रीत्वाचा अपमान केल्याप्रकरणी पालकमंत्री जयकुमार भगवानराव गोरे पालकमंत्री यांना प्रणिती शिंदे यांचे वकील ॲड. असीम सरोदे, ॲड. श्रीया आवले, ॲड.आर्या राजेभोसले यांच्यातर्फे कायदेशीर नोटीस पाठविण्यात आलेली आहे.

दिनांक ८ मे २०२६ रोजी सोलापूरमधील प्रसारमाध्यमांशी संवाद



साधताना काँग्रेस खासदार प्रणिती शिंदे यांना लक्ष्य करून जयकुमार गोरे यांनी एक विधान केले होते. खा.प्रणिती शिंदे यांना सोलापूरमधील स्थानिक विकासापेक्षा फक्त दिल्लीचा रस्ता आणि राहुल गांधी यांच्या घराकडेच लक्ष केंद्रित करतात असा त्या विधानाचा सूर होता. सोलापूरमधील ८२ किलोमीटरच्या मोहोळ-वळसंग रस्त्यावरून सुरू असलेल्या श्रेयवादाच्या लढाईदरम्यान जयकुमार गोरे यांनी हे द्वयर्थी विधान केले. या विधानाचा मोठ्या प्रमाणावर प्रसार झाला असून, यामुळे आमच्या पक्षकार खा.प्रणिती शिंदे यांच्या सामाजिक प्रतिष्ठेला हानी पोहोचली आहे. त्या विधानाचा टोन (सूर) आणि ज्या पद्धतीने ते वाक्य म्हटले तो हेतू कलुषित होता. आमच्या अशिलाला फक्त श्री. राहुल गांधी यांच्या घराचा रस्ता माहित आहे असे म्हणतांना जयकुमार गोरे यांचा स्पष्ट हेतू लैंगिक दृष्टिकोनातून टिप्पणी करण्याचा आणि एका महिलेचे चारित्र्यहनन करण्याचा होता. गोरे यांना पत्रकाराने विचारलेल्या प्रश्नाशी त्यांचे विधान पूर्णपणे अप्रासंगिक आणि अनावश्यक होते असे ॲड. असीम सरोदे म्हणाले.

अलीकडच्या काळात अनेक प्रसंगी जयकुमार गोरे यांनी टीकेच्या मयार्दा ओलांडून माज्या पक्षकार खा. प्रणिती शिंदे यांना वैयक्तिक दूषणे देण्याच्या पातळीवर लक्ष्य केले आहे. त्यांच्या अनेक अपमानास्पद विधानांनकडे खा. प्रणिती ताईंनी दुर्लक्ष केले. परंतु, इतरांबद्दल (पान 2 वर..)

## संपादकीय

# इज जस्टिस डिनाइड

'जस्टिस डिलेड इज जस्टिस (Justice) डिनाइड' अर्थात प्रलंबित न्याय म्हणजे नाकारलेला न्याय. या प्रलंबित न्यायामुळेच गुन्हेगाराचे फावते आणि गुन्हे एकामागून एक होतच राहतात. हे चक्र कुठेतरी थांबावे असे वाटत असेल, तर काही बदल होणे अपरिहार्य आहे. नराधमांनी चिमुकल्या मुलांवर/मुलींवर अत्याचार करण्याचं सत्र थांबण्याचं नावच घेत नाही. सगळीकडे याच निरंतर घडत असलेल्या अपराधांची चर्चा होताना दिसते आहे. लोकभावना तीव्र झाल्या आहेत–इतक्या की एका अत्याचारकर्त्याच्या पत्नीनं त्याला खुशाल ठेचून मारावं इथपर्यंत सांगितलं आहे.

पण मूळ मुद्दा वेगळाच आहे. एकापाठोपाठ एक नव्हे तर अशा अत्याचाराच्या अनेक घटना कशा घडत आहेत? अपराधकर्त्यांना न्यायव्यवस्थेची आणि सुरक्षायंत्रणेची (पोलिसांची) भीतीच उरली नाहीये का? या प्रश्नाची उकल करण्याआधी अपराधकर्त्यांची मानसिकता काय असेल किंवा असू शकते याचा खोलवर विचार केला पाहिजे. अपराधकर्त्याच्या मनात आपल्याला कायद्याप्रमाणे मृत्युदंड होऊ शकतो याची जाणीव नक्कीच असणार. याचं कारण म्हणजे सिद्ध झालेल्या गुन्ह्यांबद्दल गुन्हेगाराला आजन्म कारावास किंवा फाशीची शिक्षा झाल्याचं वृत्त नेहमी येत असतं. परंतु अशा वृत्तांपेक्षा अत्याचारांची वृत्तं नेहमीच जास्त असतात. याचाच अर्थ असा की वर टांगलेल्या तलवारीची कल्पना असूनही बिनदिक्कतपणे कोवळ्या वयाच्या मुला-मुलींवर अत्याचार करायला अपराधकर्ता तयार होतो.

### या बेमुर्वतखोरपणाचं कारण काय?

एक म्हणजे गुन्हे दाखल होण्याचं प्रमाण हे घडत असलेल्या अत्याचारांच्या गुन्ह्यांपेक्षा बरंच कमी असल्याची जाणीव अपराधकर्त्याला असली पाहिजे. सर्वसाधारण चर्चेमध्ये आणि माध्यमांतील चर्चांमध्ये देखील हा मुद्दा नेहमी येतो की समोर येणाऱ्या गुन्ह्यांचं प्रमाण खूपच कमी असलं पाहिजे. म्हणजे जर पडद्याआड घडणारे अत्याचारांचे गुन्हे मोठ्या संख्येने असतील तर आपण पकडले जाण्याचं प्रमाण नगण्य आहे अशी अपराधकर्त्याची धारणा होते.

याचं मुख्य कारण म्हणजे ज्या लहान मुला-मुलीवर अत्याचार झालेले असतात त्यांचे पालक भीतीपोटी किंवा अत्याचाराची लज्जास्पद घटना सर्वासमोर येऊ नये या विचारामुळे तक्रार करत नाहीत. जरी पॉक्सो कायद्यानुसार असे अत्याचार हे दखलपात्र गुन्हे असले तरी पोलीस आपणहून गुन्हा दाखल करण्याची शक्यता कमीच. कारण अगदी तक्रार करायला गेलं तरी गुन्हा दाखल करायला पोलीस लगेच तयार होत नाहीत.

गुन्हा सामान्यतः अंधारात किंवा दिवसा असल्यास दुर्गम ठिकाणी केला जातो त्यामुळे अपराधकर्त्याला पळून जायला वाव असतो. गुन्हेगार अगदी पकडला गेला तरी पोलिसांना पुरावे गोळा करायला खूप वेळ लागतो. सर्वोच्च न्यायालयानं Ball is the rule, jail is the exception म्हणजे जामीन हा नियम आणि तुरुंग हा अपवाद आहे असं म्हटलेलं असल्यानं न्यायालयीन कोठडीची मुदत संपली की अपराधकर्ता जामिनावर सुटू शकतो. असं लक्षात आलेलं आहे की अनेकदा जामिनावर सुटून आलेले गुन्हेगार पुन्हा तसाच अत्याचाराचा अपराध करतात.

नसरापूरला झालेल्या अत्याचाराचा अभ्यास केल्यावर असं दिसून येईल की अपराधकर्त्यानं नव्वदच्या दशकात असाच गुन्हा केला होता आणि त्यानंतरही असा आणखी एक अत्याचार केला होता. याचा अर्थ असा की गुन्हा करून तीसएक वर्ष झाली तरीसुद्धा गुन्हेगार उजळ माथ्यानं समाजात वावरत होता. असं होत असेल तर गुन्हेगाराला भीती कशाची?

हे सगळं पाहिल्यावर असा विचार मनात येतो की हे निरंतर चक्र थांबणार आहे की नाही? आतापर्यंतच्या अनुभवावरून तर असं दिसतंय की हे सहजी थांबण्याची शक्यता नाही. उलट रोज वृत्तपत्र उघडल्यावर हा प्रकार चढत्या भांजणीनंच पुढे चाललेला आहे.

या सर्वाच्या मुळाशी एकच महत्त्वाची गोष्ट आहे. ती म्हणजे न्यायव्यवस्थेतील अक्षम्य दिरंगाई. अक्षम्य अशाकरता की गुन्ह्यांबद्दल शासन झालं नाही तर त्यामुळे गुन्हेगार अधिक गुन्हे करायला प्रवृत्त होतो. इंग्रजीत एक म्हण आहे– जस्टिस डिलेड इज जस्टिस डिनाइड. याचा अर्थ– प्रलंबित न्याय म्हणजे नाकारलेला न्याय. न्यायव्यवस्था सक्षम आणि बळकट तर झालीच पाहिजे परंतु गंभीर अपराधांमध्ये न्यायदान हे अतिशीघ्र व्हायला हवं.

न्यायव्यवस्थेत पोलीस खात्याचा कारभारही येतो. त्यांनीही गुन्हा नोंदवणं, वेगानं तपासकार्य पुढे नेणं हे अपेक्षित आहे. न्यायव्यवस्थेची बैठक 'अनेक गुन्हेगार सुटले तरी चालतील; परंतु निरपराधाला शासन होता कामा नये' या तत्त्वावर बेतलेली आहे. या तत्त्वाचाही पुनर्विचार व्हावा. या तत्त्वाऐवजी 'कुठलाही गंभीर अपराधकर्ता शिक्षेतून सुटणार नाही आणि निरपराधालाही शासन होणार नाही' असं तत्त्व का असू नये? अपराध सिद्ध करणं, पुरावे जमा करणं हे कठीण काम आहे हे मान्य. पण आजकालच्या एआय (कृत्रिम प्रज्ञा) जमान्यात हे कठीण काम काही प्रमाणात तरी सुलभ व्हायला हरकत नाही. तसं झालं तर गुन्हेगारीला मोठ्या प्रमाणात आळा बसू शकेल आणि कोवळ्या बालकांवरच्या अत्याचारांना निश्चित लगाम बसेल. वेगळ्या शब्दांत सांगायचं झालं तर आधुनिक युगात न्यायप्रणालीचं संपूर्ण नूतनीकरण करणं आवश्यक आहे. कोट्यावधी प्रकरणं प्रलंबित असताना न्यायालयाला महिनाभर सुट्टी कशी असू शकते. ज्याप्रमाणे रेल्वे, पोस्ट, वाहिन्या यांसह अत्यावश्यक सेवा सतत चालू असतात त्या जमान्यात न्यायव्यवस्थाही 24X7 असायला काय हरकत आहे? याच व्यवस्थेतील पोलीस 24X7 कार्यरत असतातच ना? त्यांची व्यवस्थाही अत्याधुनिक असायला हवी.

पळून जाणाऱ्या अपराधकर्त्याचा शोध जीपमधून कशाला? तपास करणाऱ्यांच्या दिमतीला हेलिकॉप्टर देता येत नाही का? का केवळ व्हीआयपींसाठीच ही तरतूद आहे? न्यायदेवता आंधळी असते हे एका अर्थी योग्यच आहे. तथापि न्यायदेवतेला निष्पाप बालकांवर होत असलेले अनन्वित आणि निर्घृण अत्याचार पाहण्यासाठी कधीतरी डोळस व्हावंच लागेल.

# कुटुंब : समाजजीवनाचा सशक्त आधार

मानव हा मूलतः सामाजिक प्राणी आहे. समाजात राहून, परस्परांशी संवाद साधून आणि नातेसंबंध जपत तो आपले जीवन समृद्ध करतो. या सामाजिक जीवनाचा पाया म्हणजे कुटुंब. व्यक्तीच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत तिच्या जीवनाला आकार देणारी, संस्कारांची शिदोरी देणारी आणि संकटसमयी आधार देणारी सर्वात महत्त्वाची संस्था म्हणजे कुटुंब होय. जगभरात सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि तांत्रिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर बदल होत असताना कुटुंब संस्थेचे महत्त्व अधिक अधोरेखित होत आहे. या पार्श्वभूमीवर दरवर्षी १५ मे हा दिवस 'आंतरराष्ट्रीय कुटुंब दिन' म्हणून साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्र संघाने १९९३ मध्ये हा दिवस घोषित केला आणि १९९४ पासून जगभरात त्याचे औपचारिक आयोजन सुरू झाले. या दिवसामागील मुख्य उद्दिष्ट म्हणजे कुटुंब संस्थेचे समाजातील महत्त्व अधोरेखित करणे, कुटुंबांसमोरील समस्या समजून घेणे आणि कुटुंबव्यवस्थेला अधिक सक्षम करण्यासाठी समाज व शासन यांना जागृत करणे होय.

भारतीय संस्कृतीत कुटुंबाला अत्यंत पवित्र आणि महत्त्वाचे स्थान दिले गेले आहे. 'वसुधैव कुटुंबकम' ही संकल्पना भारतीय परंपरेतूनच जगाला मिळाली आहे. संपूर्ण विश्व हे एक कुटुंब आहे, अशी व्यापक भावना भारतीय संस्कृती जोपासते. त्यामुळेच भारतीय समाजात कुटुंब ही केवळ राहण्याची व्यवस्था नसून ती भावनिक, नैतिक, सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्यांची जपणूक करणारी जीवनपद्धती मानली जाते. आई-वडील, आजी-आजोबा, भाऊ-बहिण, नातेवाईक आणि इतर सदस्य यांच्यातील प्रेम, जिव्हाळा, सहकार्य आणि त्याग या मूल्यांमुळे कुटुंब अधिक दृढ बनते. कुटुंब ही व्यक्तीच्या भावविश्वाची पहिली शाळा असते. बालकाच्या व्यक्तिमत्त्व विकासाची सुरुवात कुटुंबातूनच होते. बोलणे, चालणे, वागणे, इतरांशी संबंध ठेवणे, संस्कार, नैतिकता, शिस्त, सहकार्य, आदर, कर्तव्यभावना आणि सामाजिक जबाबदारी यांचे प्राथमिक शिक्षण बालकाला कुटुंबातून मिळते.

कुटुंब संस्थेचा इतिहास अत्यंत प्राचीन आहे. मानवाच्या आदिम जीवनात संरक्षण, अन्न, सुरक्षितता आणि प्रजनन या गरजांमधून कुटुंबव्यवस्थेची निर्मिती झाली. कालांतराने समाजरचना बदलत गेली आणि कुटुंबसंस्थाही विकसित होत गेली. प्राचीन काळात संयुक्त कुटुंब पद्धतीला विशेष महत्त्व होते. एकाच घरात अनेक पिढ्या एकत्र राहून परस्पर सहकार्याने जीवन जगत असत. या पद्धतीत आर्थिक सुरक्षितता, मुलांचे संगोपन, वृद्धांची काळजी आणि सांस्कृतिक परंपरांचे जतन सहज शक्य होत असे. आधुनिक काळात शहरीकरण, औद्योगिकीकरण, स्थलांतर, शिक्षणाचा प्रसार आणि व्यक्तिस्वातंत्र्याच्या संकल्पनांमुळे विभक्त कुटुंब पद्धती वाढू लागली. आज बहुसंख्य कुटुंबे आई-वडील आणि मुलांपुरती मर्यादित झालेली दिसतात. तथापि, कुटुंबाचे स्वरूप बदलले असले तरी त्याचे महत्त्व अजिबात कमी झालेले नाही.

आजच्या धकाधकीच्या जीवनात कुटुंब ही व्यक्तीसाठी मानसिक शांतता आणि भावनिक आधार देणारी सर्वात मोठी शक्ती आहे. जीवनातील संघर्ष, स्पर्धा, ताणतणाव आणि असुरक्षितता यांमुळे अनेक व्यक्ती मानसिकदृष्ट्या अस्थिर होत आहेत. अशा परिस्थितीत प्रेमळ कुटुंब व्यक्तीला धीर, आत्मविश्वास आणि मानसिक आधार देते. कुटुंबातील सदस्यांमधील संवाद, सहानुभूती आणि परस्पर विश्वास यांमुळे व्यक्तीला सुरक्षिततेची भावना मिळते. विशेषतः बालक, महिला आणि वृद्ध यांच्यासाठी कुटुंबाचे महत्त्व अधिक असते. बालकाच्या मानसिक, बौद्धिक आणि भावनिक विकासासाठी कुटुंबातील वातावरण अत्यंत महत्त्वाचे असते. ज्या कुटुंबात प्रेम, शिस्त, समता आणि संवाद असतो, त्या कुटुंबातील मुले आत्मविश्वासपूर्ण आणि सामाजिकदृष्ट्या सक्षम बनतात.

महिलांच्या जीवनातही कुटुंबाचे विशेष स्थान आहे. भारतीय समाजात महिलेला कुटुंबाचा केंद्रबिंदू मानले जाते. आई म्हणून ती मुलांवर संस्कार करते, पत्नी म्हणून सहजीवनाला बळ देते आणि मुलगी म्हणून कुटुंबातील नात्यांना जिव्हाळा देते. तथापि, अनेक वेळा महिलांवर घरगुती जबाबदाऱ्यांचे ओझे अधिक पडते. आधुनिक काळात महिलांनी शिक्षण, रोजगार, उद्योग, राजकारण, विज्ञान आणि प्रशासन अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती केली आहे. त्यामुळे कुटुंबातील भूमिका आणि जबाबदाऱ्या यामध्येही बदल होत आहेत. स्त्री-पुरुष समानतेची भावना, परस्पर सन्मान आणि सहकार्य यांवर आधारित कुटुंबव्यवस्था आजच्या काळाची गरज बनली आहे. महिलांच्या सक्षमीकरणाशिवाय कुटुंबाचे सुदृढीकरण शक्य नाही.

वृद्धांच्या दृष्टीने कुटुंब हा जीवनाचा आधारस्तंभ असतो. वाढत्या वयामुळे निर्माण होणाऱ्या शारीरिक आणि मानसिक समस्यांमध्ये कुटुंबीयांचे सहकार्य अत्यंत आवश्यक असते. परंतु आधुनिक जीवनशैली, स्थलांतर आणि विभक्त कुटुंब पद्धतीमुळे अनेक वृद्ध एकाकीपणाला सामोरे जात आहेत. वृद्धाश्रमांची वाढती संख्या ही सामाजिक चिंतेची बाब आहे. ज्येष्ठ नागरिकांकडे अनुभवाचा मोठा खजिना असतो. त्यांच्या मार्गदर्शनामुळे कुटुंबातील तरुण पिढीला जीवनमूल्ये समजतात. त्यामुळे वृद्धांचा सन्मान, त्यांची काळजी आणि त्यांच्याशी संवाद राखणे हे प्रत्येक कुटुंबाचे नैतिक कर्तव्य आहे.

कुटुंब ही केवळ भावनिक संस्था नसून आर्थिकदृष्ट्याही महत्त्वाची संस्था आहे. कुटुंबातील सदस्य परस्पर सहकार्याने आर्थिक गरजा पूर्ण करतात. उत्पन्न, खर्च, बचत आणि नियोजन या गोष्टींचे व्यवस्थापन कुटुंबातूनच शिकले जाते. गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांमध्ये परस्पर सहकार्यामुळे अनेक संकटांना सामोरे जाणे शक्य होते. बेरोजगारी, आजारपण, अपघात किंवा आर्थिक अडचणीच्या काळात कुटुंब हे व्यक्तीचे सर्वात मोठे संरक्षण असते. ग्रामीण भागात शेती, पशुपालन आणि घरगुती उद्योग यामध्ये कुटुंबातील सर्व सदस्य सहभागी होत असल्यामुळे आर्थिक स्थैर्य निर्माण होते.

कुटुंब हे संस्कृती आणि परंपरांचे जतन करणारे महत्त्वाचे माध्यम आहे. भाषा, धर्म, सण-उत्सव, चालीरीती, लोकपरंपरा आणि सामाजिक मूल्ये यांचा वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे कुटुंबातूनच पोहोचतो. दिवाळी, दसरा, ईद, ख्रिसमस, बुद्ध पौर्णिमा, गणेशोत्सव किंवा इतर सण एकत्र साजरे केल्यामुळे नात्यांमध्ये आपुलकी वाढते. भारतीय संस्कृतीतील 'एकत्र कुटुंब' ही संकल्पना सामूहिक जीवन, सहजीवन आणि सामाजिक एकात्मतेचे प्रतीक आहे. कुटुंबातील सण-समारंभ, विवाह, धार्मिक विधी आणि सामाजिक कार्यक्रम हे व्यक्तींना एकमेकांशी जोडून ठेवतात.

आजच्या डिजिटल युगात कुटुंबसंस्थेसमोर अनेक नवीन आव्हाने उभी राहिली आहेत. मोबाईल, इंटरनेट आणि सामाजिक माध्यमांचा अतिरेकी वापर यामुळे कुटुंबातील प्रत्यक्ष संवाद कमी होत आहे. एकाच घरात राहूनही सदस्य एकमेकांपासून मानसिकदृष्ट्या दूर जात असल्याचे चित्र दिसते. कामाचा वाढता ताण, व्यस्त जीवनशैली आणि स्पर्धात्मक वातावरण यांमुळे कुटुंबासाठी वेळ देणे कमी झाले आहे. अनेकदा संवादाचा अभाव, गैरसमज, अपेक्षाभंग आणि आर्थिक ताण यांमुळे कौटुंबिक कलह निर्माण होतात. घटस्फोटांचे वाढते प्रमाण, कौटुंबिक हिंसा, व्यसनाधीनता आणि मानसिक आरोग्याच्या समस्या यांमुळे कुटुंबव्यवस्था अस्थिर होत असल्याची चिंता व्यक्त केली जाते.

बालकांवरील वाढते मानसिक दडपण हीदेखील गंभीर समस्या आहे. शैक्षणिक स्पर्धा, करिअरची चिंता आणि पालकांच्या अपेक्षा यांमुळे अनेक मुले तणावग्रस्त होत आहेत. अशा वेळी मुलांशी मैत्रीपूर्ण संवाद साधणे, त्यांच्या भावना समजून घेणे आणि त्यांना प्रेमळ वातावरण देणे अत्यंत आवश्यक आहे. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी केवळ भौतिक सुविधा पुरेशा नसतात; त्यांना भावनिक सुरक्षितता आणि आत्मीयतेची गरज असते. कुटुंबातील सकारात्मक वातावरणामुळे मुलांमध्ये आत्मविश्वास, सर्जनशीलता आणि सामाजिक संवेदनशीलता विकसित होते.

कौटुंबिक हिंसा ही कुटुंबसंस्थेसमोरील आणखी एक गंभीर समस्या आहे. महिलांवर होणारा शारीरिक, मानसिक आणि आर्थिक अत्याचार, मुलांवरील हिंसा आणि वृद्धांचा छळ या समस्या अनेक कुटुंबांमध्ये दिसून येतात. अशा प्रकारच्या हिंसेमुळे कुटुंबातील विश्वास आणि प्रेम नष्ट होते. त्यामुळे समाजात असुरक्षितता आणि मानसिक अस्थिरता वाढते. कुटुंबातील प्रत्येक सदस्याचा सन्मान, समानता आणि स्वातंत्र्य यांचे रक्षण करणे आवश्यक आहे. कायद्याबरोबरच सामाजिक जागृती आणि संवेदनशीलता यांद्वारेच या समस्यांवर प्रभावी उपाय करता येतील.

कोविड-19 महामारीच्या काळात कुटुंबसंस्थेचे महत्त्व जगाने नव्याने अनुभवले. लॉकडाऊन, आर्थिक संकट आणि आरोग्यविषयक भीती यांच्या काळात कुटुंबीयांनी एकमेकांना मानसिक आणि भावनिक आधार दिला. अनेकांनी आपल्या कुटुंबासोबत अधिक वेळ घालवला आणि नातेसंबंधांचे महत्त्व पुन्हा जाणले. या काळात आरोग्य, सुरक्षितता आणि परस्पर सहकार्य यांचे महत्त्व अधिक स्पष्ट झाले. त्याचबरोबर घरगुती हिंसा, बेरोजगारी आणि मानसिक तणाव यांसारख्या समस्याही समोर आल्या. त्यामुळे कुटुंबव्यवस्था अधिक संवेदनशील आणि समतोल बनविण्याची गरज अधोरेखित झाली.

आंतरराष्ट्रीय कुटुंब दिनाच्या निमित्ताने विविध देशांमध्ये जनजागृती कार्यक्रम, परिसंवाद, कार्यशाळा आणि सांस्कृतिक उपक्रम आयोजित केले जातात. कुटुंब कल्याण, महिलांचे सक्षमीकरण, बालहक्क, वृद्धांची सुरक्षा आणि मानसिक आरोग्य यांसारख्या विषयांवर चर्चा केली जाते. संयुक्त राष्ट्र संघ दरवर्षी या दिनासाठी विशिष्ट संकल्पना जाहीर करतो. या संकल्पनांमधून कुटुंबसंस्थेच्या विविध पैलूंवर जागतिक स्तरावर लक्ष केंद्रित केले जाते. शाश्वत विकास, लिंग समानता, आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक समावेशकता यांसारख्या उद्दिष्टांच्या पूर्ततेत कुटुंबाची भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली जाते.

भारतातील कुटुंबव्यवस्थेची काही वैशिष्ट्ये विशेष उल्लेखनीय आहेत. भारतीय कुटुंबांमध्ये नातेसंबंधांना मोठे महत्त्व दिले जाते. परस्पर आदर, मोठ्यांचा सन्मान, लहानांवर प्रेम आणि सामूहिक निर्णय प्रक्रिया या मूल्यांमुळे भारतीय कुटुंबव्यवस्था मजबूत राहिली आहे. ग्रामीण भागात अजूनही संयुक्त कुटुंब पद्धतीचे अस्तित्व काही प्रमाणात दिसून येते. तथापि, बदलत्या सामाजिक परिस्थितीत कुटुंबव्यवस्थेतही परिवर्तन होत आहे. महिलांचे शिक्षण, रोजगार, स्थलांतर आणि शहरीकरण यांमुळे पारंपरिक भूमिकांमध्ये बदल होत आहेत. या बदलांना सकारात्मक दृष्टीने स्वीकारून समतोल आणि संवेदनशील कुटुंबव्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे.

आजच्या काळात कुटुंबातील संवादाचे महत्त्व अधिक वाढले आहे. संवाद हा कोणत्याही नात्याचा आत्मा असतो. कुटुंबातील सदस्यांनी एकमेकांच्या भावना समजून घेतल्या पाहिजेत. मतभेद असले तरी परस्पर आदर आणि संयम राखणे गरजेचे आहे. अनेक समस्या संवादाच्या अभावामुळे निर्माण होतात. त्यामुळे दररोज काही वेळ एकत्र घालवणे, चर्चा करणे, जेवण एकत्र घेणे आणि कुटुंबीयांच्या सुख-दुःखात सहभागी होणे यामुळे नात्यांमध्ये दृढता येते.

कुटुंबातील मुलांना नैतिक मूल्यांचे शिक्षण देणे ही काळाची गरज आहे. प्रामाणिकपणा, सहकार्य, पर्यावरण संरक्षण, सामाजिक जबाबदारी, ज्येष्ठांचा आदर आणि स्त्री-पुरुष समानता यांसारखी मूल्ये बालपणापासून रुजविणे आवश्यक आहे. आज माध्यमे आणि डिजिटल जगाचा मुलांवर मोठा प्रभाव पडत आहे. त्यामुळे पालकांनी मुलांच्या मानसिक आणि सामाजिक विकासाकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. मुलांना केवळ शैक्षणिक यशासाठी प्रोत्साहित न करता त्यांना संवेदनशील आणि जबाबदार नागरिक बनविण्यावर भर दिला पाहिजे.

आर्थिक बदलांचा कुटुंबसंस्थेवर मोठा परिणाम होत आहे. वाढती महागाई, बेरोजगारी, रोजगारातील अस्थिरता आणि स्थलांतर यांमुळे अनेक कुटुंबे तणावाखाली आहेत. कामाच्या निमित्ताने पालक घराबाहेर अधिक वेळ घालवत असल्यामुळे मुलांसोबतचा संवाद कमी होतो. दुसरीकडे, महिलाही रोजगार क्षेत्रात सक्रिय झाल्यामुळे घरातील जबाबदाऱ्यांचे पुनर्वाटप आवश्यक झाले आहे. घरकाम आणि मुलांचे संगोपन ही केवळ महिलांची जबाबदारी नसून ती सर्व सदस्यांची सामूहिक जबाबदारी आहे, ही भावना समाजात दृढ होणे आवश्यक आहे.

मानसिक आरोग्य आणि कुटुंब यांचा अतिशय जवळचा संबंध आहे. ज्या व्यक्तीला कुटुंबाचा आधार मिळतो, ती व्यक्ती मानसिकदृष्ट्या अधिक सक्षम राहते. प्रेम, विश्वास आणि सहकार्य यांमुळे व्यक्तीच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण होते. उलटपक्षी, कौटुंबिक तणाव, हिंसा किंवा दुर्लक्ष यांमुळे नैराश्य, चिंता आणि मानसिक विकार निर्माण होऊ शकतात. त्यामुळे कुटुंबातील प्रत्येक सदस्याच्या भावनांचा आदर करणे आणि मानसिक आरोग्याविषयी जागरूकता वाढविणे आवश्यक आहे.

आंतरराष्ट्रीय कुटुंब दिन हा केवळ एक औपचारिक उत्सव नसून समाजाला आत्मपरीक्षण करण्याची संधी आहे. आपण आपल्या कुटुंबासाठी किती वेळ देतो? कुटुंबातील सदस्यांच्या भावना कितपत समजून घेतो? वृद्ध, महिला आणि मुलांच्या गरजांकडे किती संवेदनशीलतेने पाहतो? या प्रश्नांचा विचार या निमित्ताने होणे आवश्यक आहे. आधुनिक जीवनशैलीत भौतिक सुखसोयी वाढल्या असल्या तरी नातेसंबंधांमध्ये दुरावा निर्माण होत असल्याचे दिसते. त्यामुळे कुटुंबातील प्रेम, संवाद आणि सहजीवन यांना नव्याने बळ देणे ही काळाची गरज आहे.

शिक्षण संस्थांनीदेखील कुटुंबमूल्यांच्या जपणुकीत महत्त्वाची भूमिका बजावली पाहिजे. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक संवेदनशीलता, सहकार्य आणि कुटुंबाविषयी आदर निर्माण करणारे उपक्रम राबविणे आवश्यक आहे. समाजमाध्यमे, चित्रपट आणि प्रसारमाध्यमे यांनीही सकारात्मक कुटुंबमूल्यांचा प्रसार करणे गरजेचे आहे. केवळ मनोरंजनासाठी हिंसा, तणाव किंवा नकारात्मक नातेसंबंध दाखविण्याऐवजी प्रेम, समता आणि सहजीवन यांचे महत्त्व अधोरेखित केले पाहिजे.

शासन स्तरावरही कुटुंबसंस्थेला बळकटी देण्यासाठी विविध योजना आणि धोरणांची आवश्यकता आहे. महिलांचे संरक्षण, बालहक्क, वृद्धकल्याण, आरोग्य सुविधा, शिक्षण आणि रोजगार निर्मिती या माध्यमातून कुटुंबांचे जीवनमान सुधारता येऊ शकते. कौटुंबिक समुपदेशन केंद्रे, महिला सहाय्यता केंद्रे आणि मानसिक आरोग्य सेवा यांचा विस्तार करणे आवश्यक आहे. विशेषतः ग्रामीण आणि आदिवासी भागांमध्ये सामाजिक सुरक्षा आणि आरोग्य सुविधांची उपलब्धता वाढविणे गरजेचे आहे.

ग्रामीण समाजात कुटुंबव्यवस्था अजूनही सामाजिक ऐक्य टिकवून ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. शेती, सण-उत्सव, सामाजिक कार्यक्रम आणि परंपरा यांमुळे कुटुंबातील सदस्य एकत्र राहतात. परंतु ग्रामीण भागातही स्थलांतर, बेरोजगारी आणि आर्थिक संकट यांमुळे कुटुंबसंस्थेवर परिणाम होत आहे. त्यामुळे ग्रामीण विकास, रोजगारनिर्मिती आणि शिक्षणाच्या संधी वाढविणे आवश्यक आहे.

आदिवासी समाजातील कुटुंबव्यवस्था देखील अनेक बाबतीत वैशिष्ट्यपूर्ण आहे. सामूहिकता, निसर्गाशी जवळीक आणि परस्पर सहकार्य ही त्यांची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. तथापि, आधुनिकतेच्या प्रभावामुळे आणि आर्थिक बदलांमुळे त्यांच्या पारंपरिक जीवनपद्धतीत बदल होत आहेत. आदिवासी कुटुंबांचे सामाजिक आणि सांस्कृतिक संरक्षण करणे हे देखील समाजाचे कर्तव्य आहे.


कुटुंबातील महिलांचा सन्मान आणि निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढविणे ही सुदृढ समाजनिर्मितीची पूर्वअट आहे. स्त्री-पुरुष समानता ही केवळ कायद्याची बाब नसून ती सामाजिक मानसिकतेचा भाग बनली पाहिजे. मुलगा आणि मुलगी यांच्यातील भेदभाव नष्ट करून समान संधी देणे आवश्यक आहे. मुलींना शिक्षण, आरोग्य आणि स्वावलंबनाच्या संधी मिळाल्यास संपूर्ण कुटुंब आणि समाजाचा विकास अधिक वेगाने होतो.

तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास कुटुंबसंस्था अधिक मजबूत होऊ शकते. दूर राहणारे कुटुंबीय व्हिडिओ कॉल, संदेश आणि सामाजिक माध्यमांद्वारे संपर्कात राहू शकतात. परंतु तंत्रज्ञानाचा अतिरेकी वापर नात्यांमध्ये दुरावा निर्माण करू शकतो. त्यामुळे डिजिटल साधनांचा समतोल आणि जबाबदारीने वापर करणे आवश्यक आहे.

आंतरराष्ट्रीय कुटुंब दिन आपल्याला हे स्मरण करून देतो की समाजाच्या प्रगतीचा पाया सुदृढ कुटुंबव्यवस्थेत आहे. व्यक्ती घडली तर कुटुंब घडते आणि कुटुंब घडले तर समाज व राष्ट्र मजबूत होते. प्रेम, संवाद, परस्पर आदर, समानता आणि सहकार्य या मूल्यांवर आधारित कुटुंबव्यवस्था निर्माण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. आधुनिकतेच्या प्रवाहात पारंपरिक मूल्यांचे जतन करताना नव्या विचारांना स्वीकारणे आवश्यक आहे. बदलत्या काळानुसार कुटुंबाचे स्वरूप बदलत असले तरी त्याची गरज आणि महत्त्व कायम राहणार आहे.

आजच्या वेगवान आणि स्पर्धात्मक युगात प्रत्येक व्यक्तीला भावनिक आधाराची गरज आहे. हा आधार कुटुंबच देऊ शकते. पैसा, पद आणि प्रतिष्ठा यापेक्षा प्रेमळ नातेसंबंध अधिक मौल्यवान असतात. त्यामुळे आपल्या कुटुंबासाठी वेळ देणे, एकमेकांना समजून घेणे आणि संकटसमयी साथ देणे ही खरी जीवनसमृद्धी आहे. कुटुंबातील आनंद, समाधान आणि एकोपाच समाजाच्या स्थैर्याचे आणि राष्ट्राच्या प्रगतीचे खरे मापदंड आहेत.

१५ मे रोजी साजरा होणारा आंतरराष्ट्रीय कुटुंब दिन आपल्याला कुटुंबाच्या या अनमोल मूल्यांची आठवण करून देतो. या निमित्ताने प्रत्येकाने आपल्या कुटुंबातील नात्यांना अधिक दृढ करण्याचा संकल्प केला पाहिजे. प्रेम, विश्वास, समता आणि सहकार्य यांच्या आधारावर उभे राहिलेले कुटुंबच सुदृढ समाज आणि समृद्ध राष्ट्र निर्माण करू शकते. म्हणूनच कुटुंब ही केवळ सामाजिक संस्था नसून मानवी जीवनाचा आत्मा आहे, असे म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com

पान १ वरून

# पालकमंत्री गोरे यांना खा.प्रणिती शिंदे यांची...

बोलण्याची जयकुमार गोरे यांची असंस्कृत पद्धती आणि विशेषतः महिलांबद्दलचा त्यांचा दूषित दृष्टिकोन धक्कादायक रीतीने वाढला आहे. म्हणूनच, आमच्या पक्षकार प्रणिती शिंदे यांनी गोरे यांच्या या असंवेदनशील आणि बेजबाबदार सार्वजनिक वर्तनाबाबत कायदेशीर पाऊल उचलण्याचा निर्णय घेतला आहे असे नोटीसमध्ये नमूद करण्यात आलेले आहे.

महिलांबद्दलचा जयकुमार गोरे यांचा असंवेदनशील, क्रूर दृष्टिकोन आणि सहकारी महिला राजकारण्यांबद्दलचे गैरवर्तन दर्शवणाऱ्या अशा अनेक घटना आणि विधाने विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहेत. त्यापैकी काही घटना खालीलप्रमाणे आहेतः

२० जानेवारी २०२६: एका सार्वजनिक संवादादरम्यान, जयकुमार गोरे यांनी खा. प्रणितीताई शिंदे यांच्या राजकीय भूमिकेबद्दल अत्यंत आक्षेपार्ह टिप्पणी केली की, "त्या फक्त दोन पावले मागे पडल्या नाहीत, तर ५० फूट खाली पडल्या आहेत आणि तरीही त्यांचे पाय वरच आहेत."

२० एप्रिल २०२६: सार्वजनिकरित्या आमच्या पक्षकारांच्या बौद्धिक क्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आणि त्यांच्या विधानांचे वर्णन 'बौद्धिक घसरण' असे केले.

१४ एप्रिल २०२६: जिल्हा नियोजन समिती निधी वाटपाबाबत बोलताना जयकुमार गोरे यांनी बदनामीकारक तुलना केली आणि हा निधी सोलापूरसाठी आहे, 'पाकिस्तानसाठी नाही' असे म्हणून अप्रत्यक्षपणे खा. प्रणिती शिंदे यांच्या देशप्रेमावर शंका उपस्थित केली.

जयकुमार गोरे यांचे वर्तन, देहबोली आणि चेहऱ्यावरील हावभाव हे नेहमीच उद्धट, अनादरयुक्त आणि असंस्कृत राहिलेले आहेत. सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर उपलब्ध असलेल्या विविध व्हिडिओंमध्ये असे दिसून आले आहे की, ही अपमानास्पद विधाने करताना त्यांच्या देहबोलीतून एक प्रकारचा द्वेषयुक्त 'आंतरीक आनंद' आणि पश्चात्तापाचा अभाव दिसून येतो. त्यांच्या चेहऱ्यावरील इतरांच्या बद्दल तुच्छतापूर्ण हावभाव आणि उपहासात्मक सूर यातून निकोप लोकशाही चर्चेत भाग घेण्याऐवजी, माझ्या पक्षकार खा. प्रणिती शिंदे यांना सार्वजनिकरित्या अपमानित करण्याचा जयकुमार गोरे यांचा जाणीवपूर्वक हेतू दिसतो आणि त्यांची विधाने ही 'अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा' गैरवापर आहेत असेही नोटीसमध्ये नमूद करण्यात आलेले आहे.

जयकुमार गोरे यांची बोलण्याची शैली ही आत्मकेंद्री, वर्चस्ववादी आणि हेराफेरीपूर्ण आहे, त्यामुळे ते इतरांना कमी लेखून स्वतःला सगळ्या घडामोडींच्या केंद्रस्थानी ठेवण्याची त्यांची प्रवृत्ती असल्याचा, नेहमी विषयाला स्वतःकडे वळवण्याची आणि इतरांच्या कामगिरीला कमी लेखण्याची एक ठराविक वागणूक प्रक्रिया त्यांचा स्थायीभाव झालेला आहे

असा उल्लेख नोटीसमध्ये करण्यात आला आहे. राजकारणातील महिलांप्रती सभ्यता, शिष्टाचार आणि नम्रता राखण्याच्या त्यांच्या जबाबदाऱ्या समजून घेऊन जयकुमार गोरे हे स्वतःमध्ये सुधारणा करतील अशी आशा खा. प्रणिती शिंदे यांना असल्याचे त्यांनी नोटीसमध्ये म्हटले आहे.

भारतीय संविधानाचे कलम १९(१)(अ) जरी अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार देत असले, तरी ते 'सभ्यता', 'नैतिकता' आणि 'बदनामी' या संदर्भातील वाजवी निर्बंधांच्या अधीन आहे. जयकुमार गोरे यांचे वर्तन या तत्त्वांचे गंभीर उल्लंघन करणारे आहे. त्यामुळे स्त्रीत्वाचा अपमान, महिलेच्या विनयशीलतेचा अपमान, फौजदारी मानहानी (गुन्हेगारी बदनामी), खासदार प्रणिती शिंदे यांच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचवण्याच्या उद्देशाने केलेली तुमची विधाने, नैतिकतेच्या संदर्भात जयकुमार गोरे यांनी गैरवर्तन केले आणि एक मंत्री व लोकसेवक म्हणून सार्वजनिक नैतिकता आणि सभ्यतेच्या वागणुकीचे पालन करण्यात सातत्याने अपयशी ठरले असे आरोप नोटिसीमधून करण्यात आलेले आहेत.तसेच खा. प्रणिती शिंदे यांच्याबद्दल सततचा आकस आणि दुर्भावना ठेऊन काम करणे यातून पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी संविधानाच्या कलम १६४(३) अंतर्गत मंत्री म्हणून घेतलेल्या शपथेचे उल्लंघन केले आहे असा उल्लेख सुद्धा नोटिसीमधून करण्यात आलेला आहे.

नोटीस मिळाल्यापासून सात (७) दिवसांच्या आत जयकुमार गोरे यांनी खा. प्रणिती शिंदे यांची बिनशर्त सार्वजनिक माफी मागावी आणि सामाजिक माध्यमांमध्ये तसेच मुद्रित माध्यमांमध्ये (प्रिंट मीडिया) सार्वजनिक माफी प्रकाशित करावी, खा.प्रणिती शिंदे यांच्याविरुद्ध आणि सर्वसाधारणपणे महिलांविरुद्ध यापुढे कोणतीही अपमानास्पद किंवा बदनामीकारक विधाने करणे त्वरित थांबवावे अन्यथा न्यायालयात जाण्याशिवाय पर्याय उरणार नाही असे या कायदेशीर नोटीसमध्ये स्पष्ट करण्यात आल्याचे अॅड. श्रीया आवले यांनी सांगितले.

## वात्रटिका

### गुवाहटी दौरा

एक रूपवती नार सोबती
सोबती घेऊन गोमटी...
दूर भ्रमण करतो भोंदू
कधी गाठतो गुवाहटी...
इथे झाली दाटिवाटी अन
तिथे जरा भासे मोकळीक...
लोभ लालसा कुठे नेते नि
कोणासंगे वाढवते जवळीक...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडुरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडुरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः अॅड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# केंद्रीय रस्ते व वाहतूक मार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केली पालखी महामार्गाची पाहणी





**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर पंढरपूर, श्री स्वामी समर्थ अक्कलकोट, यांसारखी महत्त्वाची देवस्थाने असलेल्या सोलापूर जिल्ह्यासाठी रस्ते जाळे मजबूतीचे महत्त्व मोठे आहे. या बाबी लक्षात घेऊन बांधण्यात आलेले हे महामार्ग प्रकल्प जिल्ह्यातील आध्यात्मिक स्थळांपर्यंत पोचण्यास भाविकांसाठी सुलभ झाले आहेत. श्री विठ्लाच्या दर्शनासाठी पालखी घेऊन येणाऱ्या वारकरी भाविकांसाठी वेगळा रस्ता केला आहे. यामुळे वारकरी भाविकांची वाट सुखकर झाल्याचे प्रतिपादन केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज पालखी महामार्गाच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज केली. यावेळी त्यांच्या समवेत, पालकमंत्री जयकुमार गोरे, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार सर्वश्री सुभाष देशमुख, समाधान आवताडे, अभिजीत पाटील, माजी खासदार रणजीतसिंह निंबाळकर, माजी आमदार प्रशांत परिचारक, माजी आमदार रणजीतसिंह मोहिते पाटील, माजी आमदार राम सातपुते, जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, प्रांताधिकारी विजया पांगरकर, सचिन इथापे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रादेशिक अधिकारी अंशुमन श्रीवास्तव, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अभिजीत औटी तसेच अधिकारी, मान्यवर व पदाधिकारी उपस्थित होते.

### केंद्रीय रस्ते रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी बसने प्रवास करत पालखी महामार्गाची केली पाहणी

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पेट्रोल-डिझेलचा वापर कमी करावा, महानगरात मेट्रोने प्रवास करावा असे आवाहन केले. मोदींच्या आवाहनानुसार, रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी बसने प्रवास करत संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज पालखी महामार्गाच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी केली. तसेच आपल्या ताफ्यातील वाहनांची संख्या निम्म्यावर आणण्याचे आदेश दिले. केंद्रीय मंत्री गडकरी यांनी सुरक्षा कर्मचारी, अधिकारी यांच्यासह बसने प्रवास केला.

यावेळी केंद्रीय वाहतूक मंत्री गडकरी म्हणाले, तुळजापूर, पंढरपूर, अक्कलकोट हे रस्ते यापूर्वी मोठ्या प्रमाणात खराब झाले होते. त्यामुळे वारकरी भाविकांना वाहतुकीच्या समस्येमुळे अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. या मार्गावरील रस्ते करण्याची संधी मिळाली तर ते रस्ते चांगले कर अशी इच्छा माज्या आईनी व्यक्त केली होती. पांडुरंगाच्या व आईच्या आशीवार्दाने मला रस्ते करण्याची संधी मिळाली. सद्या पालखी महामार्गाचे ८० टक्के काम पूर्ण झाले असून, उर्वरित कामे तात्काळ पूर्ण करण्यात येतील. पालखी महामार्गावरील काही ठिकाणची रखडलेली कामे डिसेंबर अखेर पूर्ण करण्यात येतील. तसेच वाखरी ते पंढरपूर रस्त्याचे काम रेल्वे प्रशासनाकडून काही परवानगी आलेल्या नाहीत त्याबाबत तात्काळ पाठपुरावा करून काम मार्गी लावण्यात येईल असेही त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी माळशिरस तालुक्यातील घुले वस्ती येथे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी बांधलेल्या पुरातन विहिरीचे जतन व संवर्धन करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून माळशिरस तालुक्यातील घुले वस्ती या ठिकाणी पालखी महामार्गात विशेष रचना करून पुरातन विहिरीचे जतन व संवर्धन करण्यात आले. तसेच पंढरपूर तालुक्यातील भंडीशेगाव येथील बाजीराव विहिरीचे ही राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून जतन व संवर्धन करण्यात आले आहे. या दोन्ही विहिरींची पाहणी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केली. यावेळी केंद्रीय मंत्री गडकरी यांच्या हस्ते परिसरात वृक्षारोपण देखील करण्यात आले.

# पालखीतून मिरवणूक काढून संभाजी आरमारने दिली शंभुराजांना मानवंदना



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त संभाजी आरमारच्या वतीने प्रतिवर्षी शंभू अभिवादन रॅली काढली जाते. मात्र यंदा प्रथमच पालखीतून छत्रपती संभाजी महाराजांची मिरवणूक काढून शंभू छत्रपतींना मानवंदना देण्यात आली. सजवलेल्या पालखीत सिंहासनारूढ शंभूराजांची मूर्ती विराजमान झाली होती. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते छत्रपती संभाजी महाराज चौक या मार्गावरून पुष्पवृष्टी करत ही मिरवणूक काढण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीस तसेच पालखीतील शंभूराजांच्या मूर्तीस महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी माजी उपमहापौर नानासाहेब काळे, माजी नगरसेवक गुरूशांत धुत्तरगावकर, संभाजी आरमार संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे, कार्याध्यक्ष नगरसेवक शिवाजी वाघमोडे यांची प्रमुख उपस्थिती होती. महापौर विनायक कोंड्याल आणि उपमहापौर नानासाहेब काळे यांनी पालखी खांद्यावर घेऊन पालखी सोहळ्याचा शुभारंभ झाला. महापौर विनायक कोंड्याल यांनी तमाम सोलापूरवासीयांना संभाजी महाराज जयंतीच्या शुभेच्छा देऊन अखंड हिंदुस्तानची अस्मिता शंभूराजांमुळे अबाधित असल्याचे सांगितले. संभाजी आरमार संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे यांनी छत्रपती संभाजी महाराज केवळ रणांगण गाजविणारे योद्धेच नव्हते तर अनेक भाषा अवगत असणारे विद्वान, साहित्यिक देखील होते. छत्रपती संभाजी महाराजांच्या गुणांचे अनुकरून करणारी पिढी निर्माण करण्यासाठी संभाजी आरमार काम करत राहणार असल्याचे सांगितले. यावेळी डोक्यावर भगवा फेटा परिधान केलेल्या शेकडो माता-भगिनींनी पालखी वाहत संभाजी महाराजांचा जयघोष केला. छत्रपती संभाजी महाराज चौक येथे मावळ्यांनी मर्दानी खेळांचे सादरीकरण केले. छत्रपती संभाजी महाराजांच्या मूर्तीस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून या पालखी सोहळ्याचा समारोप झाला. यावेळी संभाजी आरमार उपाध्यक्ष शशिकांत शिंदे, सरचिटणीस गजानन जमदाडे, शहरप्रमुख सागर ढगे, जिल्हा संघटक अमित कदम, महिला आघाडी शहरप्रमुख संध्या हेब्बाळकर, उमा रजपूत, रेखा व्हनकडे, जानवी पतंगे, वर्षा ढगे, अनिता मोटे, अर्चना बंडगर, संतोष कदम, राज जगताप, रेवण कोळी, सागर दासी, द्वारकेश बबलादीकर, तेजस चौधरी, अर्जुन शिवसिंगवाले, प्रमोद जगताप, राजु रचा, रिक्षा संघटनेचे तानाजी जाधव, गणेश वनस्कर, संजय मस्के, वासुदेव होनकोंबडे, पिंटू औरंगे, अविनाश विटकर, आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अवैध गोवा बनावटीच्या मद्यसाठ्यावर राज्य उत्पादन शुल्क विभागाची धडक कारवाई



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या विभागीय भरारी पथकाने सोलापूर जिल्ह्यात अवैधरीत्या साठवून ठेवलेल्या गोवा बनावटीच्या विदेशी मद्यावर धडक कारवाई करत एकूण 11 लाख 55 हजार 600 रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी एका इसमाविरुद्ध गुन्हा नोंदवून त्यास अटक करण्यात आली आहे.

मा. डॉ. राजेश देशमुख, आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई, मा. प्रसाद सुर्वे, सह आयुक्त (अं.व.द.), राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई तसेच मा. सागर धोमकर, विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, पुणे विभाग, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, विभागीय भरारी पथक, पुणे विभाग, पुणे यांनी ही कारवाई केली.

सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यात खामगाव-पिंपळगाव रस्त्यालगत पवार फार्महाऊस शेजारी झाडाझुडपामध्ये लपवून ठेवलेला मद्यसाठा महाराष्ट्र दारुबंदी कायद्यान्वये जप्त करण्यात आला. या कारवाईत गोवा बनावटीच्या ह्युॲडोरियल व्हिस्कीह्च्या 750 मिली क्षमतेच्या 1284 सिलबंद बाटल्या (107 बॉक्स) असा एकूण 11,55,600 रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

दि. 22 एप्रिल 2026 रोजी माढा तालुक्यातील उपळाई गाव परिसरात अवैध मद्यविक्री करणाऱ्या ढाब्यावर कारवाईसाठी गेलेल्या राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकावर काही ढाबेमालकांकडून हल्ला करण्यात आला होता. या घटनेत अधिकारी व कर्मचाऱ्यांना मारहाण होऊन ते जखमी झाले होते. त्यानंतर विभागीय उप आयुक्त, पुणे विभाग यांच्या आदेशानुसार सोलापूर व अहिल्यानगर जिल्ह्यातील अवैध मद्यसाठा व विक्री करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई व प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्याअनुषंगाने सदरची कारवाई करण्यात आली.

या कारवाईदरम्यान घटनास्थळी आढळून आलेल्या इसमास अटक करण्यात आली असून जप्त मद्यसाठ्याबाबत त्याच्याकडून सखोल चौकशी सुरू आहे. या प्रकरणात आणखी आरोपींना अटक होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

सदरची कारवाई निरीक्षक नरेंद्र थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली दुय्यम निरीक्षक विराज माने, धीरज सस्ते, निनाद निकम, सहायक दुय्यम निरीक्षक अलिम शेख, जवान शशिकांत भट, राहुल तारळकर, प्रविण पुसावळे, हृतिक कोळपे तसेच वाहन चालक झिंगळे यांनी पार पाडली. पुढील तपास दुय्यम निरीक्षक निनाद निकम करीत आहेत.

# करमाळा शहरातील उघड्या वीज डीपींमुळे जीवितास धोका

## महावितरणकडून दखल घेण्याची गरज



**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** करमाळा शहरातील काही ठिकाणी वीज वितरणासाठी बसविण्यात आलेल्या डीपींचे दरवाजे उघडे असल्याचे निदर्शनास आले असून, यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. विशेषतः रस्त्यालगत असलेल्या या उघड्या डीपींमुळे लहान मुलांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

शहरातील अनेक भागांत उघड्या अवस्थेत असलेल्या डीपींमध्ये विद्युत यंत्रणा उघड्यावर दिसून येत असून, एखाद्या निष्पाप बालकाने कुतूहलापोटी हात घातल्यास गंभीर अपघात होऊ शकतो. सध्या अवकाळी पावसासह वादळी वारे सुरू असल्याने या डीपींमध्ये पावसाचे पाणी शिरून शॉर्टसर्किट किंवा विजेचा धक्का लागण्याची शक्यता अधिक वाढली आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित Maharashtra State Electricity Distribution Company Limited च्या कार्यालयात जाऊन शहर शाखा अभियंता शिंदे यांची भेट घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, ते रजेवर असल्याचे समजले. त्यांचा कार्यभार उघडे साहेब यांच्याकडे असल्याची माहिती कार्यालयातून देण्यात आली.

यानंतर उघडे साहेब यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क साधून शहरातील काही ठिकाणी उघड्या डीपींबाबत माहिती देत विचारणा करण्यात आली. यावर त्यांनी, 'शिंदे साहेब उद्या कार्यालयात येणार आहेत. त्यांना याबाबत माहिती देतो,' अशी प्रतिक्रिया दिली.

दरम्यान, नागरिकांनी अशा उघड्या डीपींची तातडीने दुरुस्ती करून दरवाजे बंद करण्याची मागणी केली आहे. एखादी दुर्घटना घडण्यापूर्वीच प्रशासनाने याकडे गांभीयाने लक्ष देऊन उपाययोजना करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# सोलापूरचे महापौर दर सोमवारी सायकलवरून महापालिकेत येणार



### मी स्वत:पासून सुरुवात करणार

युद्धजन्य परिस्थिती, वाढते इंधन दर, जागतिक तापमानवाढ आणि वाढते वायू प्रदूषण या पार्श्वभूमीवर इंधनाचा वापर काटकसरीने आणि गरजेपुरताच करण्याची आवश्यकता आहे, असे महापौर कोंड्याल यांनी स्पष्ट केले. इतरांना सांगताना स्वत:पासून सुरुवात होणे आवश्यक आहे, त्यामुळे येत्या सोमवारपासून मी स्वतः सायकलवरून महापालिकेत येणार आहे, असे महापौर विनायक कोंड्याल यांनी सांगितले.

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इंधन बचतीच्या आवाहनानंतर सोलापूर जिल्हा परिषदेने प्रत्येक सोमवारी 'नो व्हेईकल डे' राबविण्याचा निर्णय घेतला. सोलापूर महापालिकेनेही झेडपीच्या पावलावर पाऊन ठेवून 'नो व्हेईकल डे' जाहीर केला आहे, महापौर विनायक कोंड्याल यांनी स्वतः दर सोमवारी सायकलवरून महापालिकेत येण्याची घोषणा केली आहे.

इंधन बचत आणि पर्यावरण संरक्षणाच्या दिशेने सोलापुरात 'नो व्हेईकल डे'ची चळवळ वेग घेत असल्याचे दिसून येत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या इंधन बचतीच्या आवाहनानंतर पहिल्याच दिवशी सोलापुरात फज्जा उडाल्याची बातमी 'सकाळ'ने बोलक्या छायाचित्रासह प्रकाशित केली होती. त्यानंतर जिल्हा परिषदेकडून दर सोमवारी 'नो व्हेईकल डे' जाहीर करण्यात आला होता. आता महापालिकेनेही त्याच दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.

महापालिकेतील सर्व पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी प्रत्येक सोमवारी खासगी दुचाकी अथवा चारचाकी वाहनांचा वापर टाळावा. शासकीय वाहनांचाही कमीत कमी वापर करावा, अशी सूचना करण्यात आली आहे.

बस, सायकल, इलेक्ट्रिक वाहने किंवा पायी प्रवासाला प्राधान्य देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या उपक्रमाला पूरक म्हणून शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी येत्या दीड ते दोन महिन्यांत ४० ई-बस सुरू करण्याचा प्रयत्न महापालिकेकडून केला जाणार आहे.



# Classified - छोटी जाहीरात

## निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय

**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

## बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

## अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

## पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता
**सिक्युरिटी गार्ड**
त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

## वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**


सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंद्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779



**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) विचार विनिमय, सल्ला **** २) फुलांची माला, पराभव ३) धान्याचा ढीग ४) एक म्हण-**** *** गुडघ्याला बाशिंग ५) सैन्याला पुरविला जाणारा दाणागोटा ६) आ. बच्चू कडू यांची संघटना ७) नगर, सिटी ९) महिना १२) पानाचा विडा रंगण्यासाठी त्यामध्ये हा वापरतात १४) सहा गुणिले दोन १६) एक म्हण-उथळ पाण्याला खळखळाट ** १७) कॉलनी (मराठीत) १८) ख्रिश्चन धर्मियांचा एक सण, ख्रिसमस २१) दुर्लक्ष, आबाळ २२) पती २३) अभिनेत्री असलेली रमेश देव यांची पत्नी २६) लगेच, तात्काळ २७) चांगलाच्या विरूध्दार्थी २९) पूर्वी बांधले जाणारे चिरेबंदी चौसोपी निवासस्थान ३०) गाईचे पिल्लू ३१) उंचावरून पडणारा पाण्याचा प्रवाह ३२) स्वर्गच्या विरूध्दार्थी ३४) भित्रा, घाबरट ३५) एक दाक्षिणात्य अभिनेता-*** हसन ३८) उष्ण, तप्त ३९) भरावासाठी वापरले जाणारे दगड, मुरूम इत्यादी ४१) चिंतन ४३) भिंतीवरील सरपटणारा प्राणी ४५) सल उलट लिहा

**आडवे शब्द :** १) आपले राज्य ४) सर्वाधिक खासदार या राज्यातून निवडले जातात ८) श्रेष्ठ, वरचढ ९) आई १०) तीन दुणे ११) एक शिवकालीन घोषणा- ** हर महादेव १२) ससा आणि याची शर्यतीची गोष्ट प्रसिध्द आहे १३) राजाचा सभामंडप १५) दोहोंतील अंतर, भेद १९) पृथ्वी, पातळ कालवण २०) भारताचे यापूर्वीचे पंतप्रधान-***** सिंह २३) श्रीरामाची पत्नी २४) बसपाचे निवडणूक चिन्ह २५) महाराष्ट्रातील या जिल्ह्याच्या नावामध्ये काना, माला, वेलांटी काही नाही २६) भाकरी थापण्याचे गोलाकार पात्र २७) वायू, पवन २८) शिरा २९) पाचगणीला जाताना या शहरातून जावे लागते, सातारा जिल्ह्यातील या ठिकाणचे महागणपतीचे मंदिर प्रसिध्द आहे ३०) इंग्रजी मुळाक्षरातील शेवटून दुसरे अक्षर ३१) एक भारतीय फलंदाज-शिखर *** ३३) आकाशातील विजांचा चमकताना होणारा आवाज ३६) सर्व (हिंदीत) ३७) कडक नसलेले, मऊ ३८) आकाशात उंच भरारी घेणारा पक्षी ४०) हिंमत ४२) खांब ४३) पलीकडे, पल्याड ४४) ताकदवान ४६) पाच वजा चार ४७) जखमेवर लावतात तो ४८) रूची, आवड, फळातील द्रव ४९) पाच आणि चार मिळून होणारी संख्या

## सुडोकु - 251

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 3 | | 9 | 5 | | | | |
| 2 | | | 6 | 7 | | 5 | 8 | |
| | | 5 | | 1 | | 4 | | |
| 1 | 9 | | | 6 | 3 | 2 | | 5 |
| | 4 | | | | | 6 | | |
| 5 | 6 | 8 | 2 | | 7 | | | |
| | 2 | | | 8 | 1 | 3 | | |
| | | 1 | | | 9 | 7 | 6 | |
| | 7 | | 5 | 2 | | 8 | | 9 |

# पंढरपूरच्या वाहतूक कोंडीतून सुटका प्रशांत परिचारक यांच्या मागणीला यश



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर शहरांतर्गत होणारी जड वाहतुकीची कोंडी आणि वारकरी-स्थानिकांची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे. आज केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्गमंत्री ना.श्री.नितीनजी गडकरी यांनी परिचारक यांच्या निवासस्थानी भेट दिली असता, या प्रस्तावित चार पदरी बाह्य वळण रिंग रोडचे काम भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) यांच्या मार्फत करण्यात यावे अशी विशेष मागणी केली. या महत्त्वपूर्ण प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करून त्याला तात्काळ निधी मंजूर करण्याची घोषणा ना.गडकरी यांनी यावेळी केली.

वेणेगाव-पंढरपूर आणि पंढरपूर-मंगळवेढा या मार्गावर सध्या आंतरराज्यीय जड वाहतुकीचा प्रचंड ताण आहे. उत्तर भारताकडून अहिल्यानगर, करमाळा आणि टेंभुर्णी मार्गे येणारी मल्टी-एक्सल वाहने दक्षिण भारताकडे जाण्यासाठी पंढरपूर शहरातून प्रवास करतात. यामुळे शहरातील अंतर्गत रस्ते अपुरे पडत असून, दर्शनासाठी येणाऱ्या लाखो वारकऱ्यांच्या सुरक्षिततेचा आणि स्थानिक वाहतुकीचा प्रश्न गंभीर बनला होता.

मा.आ.प्रशांत परिचारक यांनी ना.गडकरी यांच्याकडे वाखरी-कोर्टी-लक्ष्मीटाकळी-कासेगाव-अनवली-मुंढेवाडी ते देगाव या नवीन ४-पदरी बाह्यवळण रस्त्याची मागणी लावून धरली होती. हा रस्ता पूर्णपणे ग्रीन फिल्ड अलायमेंटनुसार होत असल्याने शहराबाहेरून जड वाहतूक वळवणे सुलभ होणार आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून आ.परिचारक या रिंग रोडसाठी केंद्र सरकारकडे मागणी करत होते. आज ना.गडकरी यांच्या दौऱ्याचे औचित्य साधून त्यांनी प्रत्यक्ष निवेदन सादर केले. पंढरपूरचे भौगोलिक महत्त्व आणि वारकऱ्यांची होणारी ओढाताण लक्षात घेता, हा रस्ता पंढरपूरच्या विकासात 'गेम चेंजर' ठरेल, असे मा.आ.परिचारक यांनी यावेळी पटवून दिले.

आ.परिचारक यांच्या मागणीची दखल घेत ना.नितीन गडकरी यांनी संबंधित विभागाला या रस्त्याचा तातडीने डीपीआर तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. या प्रकल्पासाठी निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. या निर्णयामुळे पंढरपूर शहर खऱ्या अर्थाने वाहतूक कोंडीमुक्त होणार असून भाविकांचा प्रवास अधिक सुखकर होणार आहे. या महत्वपूर्ण निर्णयामुळे पंढरपूर शहरातील नागरिक व वारकरी संप्रदाय यांच्या कडून समाधान व्यक्त केले जात आहे.

यावेळी सोलापूर जिल्हयाचे पालकमंत्री मा.ना.श्री.जयकुमारजी गोरे साहेब, आ.समाधान दादा आवताडे व भारतीय जनता पार्टीचे प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जयंतीचे औचित्य साधत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन; गुणवंतांचा सत्कार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** मुरारजी पेठ येथील अरविंद धाम पोलीस वसाहतसमोर धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने छत्रपती संभाजी महाराजांच्या ३६९ व्या जयंतीनिमित्त दहावी-बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार समारंभ उत्साहात पार पडला.

यावेळी आ. विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराजांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. कार्यक्रमास शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख नगरसेवक अमोल शिंदे, क्रांती तालीम तरुण मंडळाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर सपाटे, नगरसेवक अमर पुदाले, शिवराम प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष बापू वाडेकर, मराठा क्रांती मोर्चा समन्वयक राम जाधव तसेच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अभिजित सोनके आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण व आरतीने करण्यात आली. "छत्रपती संभाजी महाराज की जय", "जय भवानी, जय शिवाजी" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. यानंतर प्रमुख मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

तसेच दहावी-बारावी परीक्षेत यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यावेळी "विद्यार्थी हेच देशाचे भविष्य असून त्यांनी पुढील आयुष्यातही असेच यश संपादन करावे," अशा शुभेच्छा मान्यवरांनी दिल्या.

सत्कार झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये धनश्री पवार, आर्या भोसले, ओंकार शेट्टी, वैष्णवी पवार, ऋतुजा जमादार, संस्कृती शिंदे, वैष्णवी नलावडे, रामेश्वरी पवार, भक्ती खरात, निकिता डोके, श्रवण पवार, राजनंदिनी घात, रुद्र पवार, समीक्षा रणदिवे, उत्कर्ष गंगणे आदी विद्यार्थ्यांचा समावेश होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसाद यांनी केले तर आभार प्रदर्शन अतुल सोनके यांनी केले.

# सेवानिवृत्तीबद्दल कृष्णकांत चव्हाण यांचा सत्कार संपन्न



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी पत्रकारांची भूमिका आणि योगदान महत्त्वाचे असते. असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष तथा मोहोळचे माजी आमदार राजन पाटील यांनी केले.

बुधवारी सायंकाळी शिरापूर तालुका मोहोळ येथे दैनिक पुण्यनगरीचे उपसंपादक कृष्णकांत चव्हाण यांच्या सेवानिवृत्ती निमित्त शिरापूरकरांच्या वतीने मारुती मंदिरात नागरी सत्कार आयोजित करण्यात आला होता. यावेळी पाटील बोलत होते. या कार्यक्रमास मोहोळ पंचायत समितीचे सभापती अस्लम चौधरी, उत्तर पंचायत समितीचे उपसभापती सुनील भोसले,नरखेड जिल्हा परिषद सदस्य लखन शिंदे, शिरापूर पंचायत समिती सदस्य नीलम मसलकर, नवनाथ मसलकर, माजी प. स. सदस्य सज्जनराव पाटील शिरपूरचे माजी सरपंच सागरराजे पांढरे, सुजाता राजेपांढरे, मीनाक्षी चव्हाण, मेघा चव्हाण, राधिका दुधगीकर,किशोर दुधगीकर, पत्रकार चंद्रकांत देवकते, महेश पांढरे, विजयकुमार चव्हाण, डीवायएसपी शहाजी शिंदे, ह.भ.प. अशोक काळे, बाळासाहेब हारदाडे, अमोल सावंत, आदी उपस्थित होते.

गावच्या, भागाच्या सर्वांगीण विकासासाठी एक सामाजिक कार्यकर्ता म्हणून कृष्णकांत चव्हाण यांनी गावच्या विकासासाठी भरीव योगदान दिले आहे. त्यामुळे अशी माणसं समाजकारणात, राजकारणात पुढे येणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांनी आता सक्रिय राजकारणात उतरण्यास कसलीच हरकत नसल्याचे पाटील यावेळी म्हणाले. यावेळी अस्लम चौधरी, लखन शिंदे, सुनील भोसले, सज्जन पाटील, ब्रह्मदेव गोपने, तसेच काही गावकऱ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

सत्कारला उत्तर देताना कृष्णकांत चव्हाण यांनी मी नोकरीतून निवृत्त झालो असलो तरी समाजकायार्तून कधीच निवृत्त होणार नाही, अखेरच्या श्वासापर्यंत मी गावची, समाजाची आणि संकटात सापडलेल्यांची मदत करेन असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी सहकार परिषदेचे अध्यक्ष राजन पाटील यांच्या हस्ते कृष्णकांत चव्हाण यांचा सपत्नीक नागरी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन फंटू गोफणे यांनी केले. तर आभार वसुदेव चव्हाण यांनी मानले.

# छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्याचा आणि बलिदानाचा आदर्श तरुण पिढीने घ्यावा- डॉ. बालाजी जाधव



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** स्वराज्याच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती देणारे स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज हे अद्वितीय पराक्रम, विद्वत्ता आणि राष्ट्रनिष्ठेचे प्रतीक होते. त्यांच्या शौर्य, त्याग आणि स्वराज्य रक्षणाच्या संघर्षमय जीवनातून आजच्या तरुण पिढीने प्रेरणा घेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन संभाजीनगर येथील व्याख्याते डॉ. बालाजी जाधव यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील ह्यस्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्राह्णच्या वतीने संभाजी महाराज जयंतीनिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. अनिल घनवट, रमेश चौंडेकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक व स्वागत करताना अध्यासन केंद्राचे अध्यक्ष प्रा. सचिन गायकवाड यांनी केंद्रामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. संभाजी महाराजांच्या इतिहासाचे संशोधन आणि नव्या पिढीपर्यंत त्यांचे कार्य पोहोचविण्याचा अध्यासन केंद्राचा प्रयत्न असल्याचे त्यांनी नमूद केले.

आपल्या व्याख्यानात डॉ. जाधव यांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनातील विविध ऐतिहासिक पैलूंवर प्रकाश टाकला. औरंगजेबाच्या अत्याचारांविरोधात त्यांनी दिलेला लढा, स्वराज्याच्या रक्षणासाठी दिलेले बलिदान, तसेच त्यांच्या अद्वितीय पराक्रमाची उदाहरणे त्यांनी प्रभावीपणे मांडली. संभाजी महाराज हे केवळ शूर योद्धे नव्हते, तर संस्कृत, हिंदी, फारसीसह अनेक भाषांवर प्रभुत्व असलेले विद्वान राजे होते, असे सांगत त्यांनी 'बुधभूषण' या ग्रंथाचाही उल्लेख केला. राष्ट्रनिष्ठा, स्वाभिमान आणि संकटातही न डगमगणारे नेतृत्व हे संभाजी महाराजांच्या जीवनातून शिकण्यासारखे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांनी महापुरुषांचे विचार आणि कार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. छत्रपती संभाजी महाराजांचे जीवन हे प्रेरणादायी असून त्यांच्या कायार्तून राष्ट्रभक्ती, त्याग आणि धैयाची शिकवण मिळते, असे ते म्हणाले.

व्याख्यानानंतर सांगली येथील प्रसिद्ध शाहीर अविष्कार देशिंगे यांच्या शाहिरी पोवाड्यांच्या कार्यक्रमाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. संभाजी महाराजांच्या पराक्रमावर आधारित पोवाड्यांना उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. देशभक्ती आणि शिवकालीन इतिहासाच्या गर्जनांनी विद्यापीठ परिसर दणाणून गेला.

या कार्यक्रमास व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा. देवानंद चिलवंत, परीक्षा संचालक डॉ. श्रीकांत अंधारे, वित्त व लेखाधिकारी सीए महादेव खराडे, अध्यासन केंद्राचे सदस्य डॉ. नेताजी कोकाटे, डॉ. विकास शिंदे यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहायक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे यांनी केले. आभार डॉ. अनिल घनवट यांनी मानले.

# महापालिकेचा नवा उपक्रम; आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली 'जनता दरबार'

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** शहरातील नागरिकांच्या तक्रारी, अडचणी आणि विविध समस्या वेळेत व प्रभावीपणे सोडवण्यासाठी महापालिकेने 'जनता दरबार' उपक्रम अधिक नियोजनबद्ध पद्धतीने राबवण्याचा निर्णय घेतला आहे. यानुसार आठवड्यातील मंगळवार व गुरुवार या दोन दिवशी दुपारी ३.३० ते ५.३० या वेळेत नागरिकांसाठी निश्चित वेळ राखून ठेवण्यात आली आहे.

महापालिका आयुक्तांच्या वतीने नागरिकांच्या तक्रारी ऐकून त्यावर तातडीने कार्यवाही व्हावी यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची रोटेशन पद्धतीने नियुक्ती करण्यात आली आहे. या अंतर्गत अतिरिक्त आयुक्त, नगर अभियंता, उपायुक्त आणि सहायक आयुक्त स्तरावरील अधिकारी नागरिकांच्या समस्या ऐकून त्यावर निर्णय घेणार आहेत.

नियोजनानुसार पहिल्या व तिसऱ्या मंगळवारी तसेच दुसऱ्या गुरुवारी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे आणि सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे उपस्थित राहतील. दुसऱ्या व चौथ्या मंगळवारी आणि पहिल्या गुरुवारी अतिरिक्त आयुक्त योगा पवार व नगर अभियंता सारिका आकुलवार उपस्थित असतील. तर तिसऱ्या-चौथ्या गुरुवारी व अतिरिक्त दिवसांमध्ये उपायुक्त सोनाली यादव आणि सहायक आयुक्त मनीषा मगर नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करतील.

तक्रारींचा दर आठवड्याला आढावा घेतला जाणार असून, निवारणाची स्थिती तपासली जाणार आहे. या उपक्रमामुळे नागरिकांना प्रशासनाशी थेट संवाद साधण्याची संधी मिळणार असून, प्रलंबित प्रश्नांना गती मिळेल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

# छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त 369 वृक्षांचे वाटप



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती संभाजी महाराज यांच्या ३६९ व्या जयंतीनिमित्त संभाजी ब्रिगेडच्या वतीने अनावश्यक खचार्ला फाटा देऊन छत्रपती संभाजी महाराज चौकात एक वृक्ष शंभुराजे साठी या संकल्पनेवर ३६९ रोपवाटप करण्यात येऊन पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यात आला.

शौर्य आणि पर्यावरणाचा जागर करून शंभूराजांच्या विचारांचा वारसा जपत, 'पर्यावरण रक्षण' हाच खरा राजधर्म मानून छत्रपती संभाजी महाराज जयंती अनोख्या पद्धतीने साजरी करण्यात आली.

सोलापूर शहराचे तापमान ४४त्उ - ४५त्उ च्या पुढे जात आहे. सिमेंटची जंगले आणि कमी झालेली वृक्षसंख्या यामुळे सोलापूर वाशीय उष्णतेच्या लाटेचा सामना करत आहेत वाढत्या तापमानामुळे नागरिकांना उकाडा असह्य होत आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी व वाढत्या उष्णतेवर मात करण्यासाठी संभाजी ब्रिगेड च्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे मा. पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष मीनल दास वकील आघाडीचे जिल्हाध्यक्ष गणेश कदम जिल्हा उपाध्यक्ष मनीषा कोळी शहर कार्याध्यक्ष सोनाली सगर शहर सचिव माधुरी चव्हाण रुचिरा चव्हाण उत्तर सोलापूर तालुकाध्यक्ष विक्रम वानकर जिल्हा कार्याध्यक्ष विशाल साळुंखे जिल्हा सचिव राजेंद्र माने आकाश भोसले आधी उपस्थित होते.

# छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त खा. प्रणिती शिंदे यांच्याकडून अभिवादन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महापराक्रमी, हिंदवी स्वराज्याचे दुसरे छत्रपती, स्वराज्यरक्षक आणि धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त खासदार प्रणिती शिंदे यांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराज चौक येथील छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी शहर काँग्रेस अध्यक्ष चेतन नरोटे, जिल्हा काँग्रेस अध्यक्ष सातलिंग शटगार, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे महेश गादेकर, माजी अध्यक्ष भारत जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

तसेच महिला अध्यक्ष प्रमिला तुपलवंडे, जिल्हा समन्वयक मनोज यलगुलवार, युवक अध्यक्ष गणेश डोंगरे, राजन कामत, श्रीशैल रणधीरे, हेमाताई चिंचोलकर, सुमन जाधव, तिरुपती परकीपंडला, पशुपती माशाळ, सचिन गुंड, शिवाजी साळुंखे, संजय गायकवाड, सागर उबाळे, अप्पासाहेब सलगर, विवेक कन्ना, योगेश सलगर, ज्योती गायकवाड, विवेक इंगळे, शशिकांत शेळके, महेंद्र शिंदे, अंजली मरोड, चंद्रकांत टिक्के, मिलिंद गोरे, मनिषा माने, साई शिंदे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळात अभिवादन कार्यक्रम



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने धर्मवीर छत्रपती संभाजी ट्रँ्र यांच्या जयंतीनिमित्त महामंडळाच्या कार्यालयात अभिवादन कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या मूर्तीला नगरसेवक मनीष केत यांच्या शुभहस्ते हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमास पद्माकर नाना काळे, जयवंत सलगर, उत्तराताई बचुटे, प्रीतम परदेशी, प्रकाश ननवरे, महादेव गवळी, अंबादास शेळके, बापू जाधव, सदाशिव पवार, प्रशांत पाटील, लिंबाजी जाधव, मतीन भाई बागवान, गोवर्धन गुंड, नागेश वडणे, बसवराज कोळी, सचिन चव्हाण, मारुती सावंत, मोहन खमितकर, परशुराम पवार, अंबादास सपकाळ, सुभाष पवार, राम माने, विश्वनाथ गायकवाड, रमेश जाधव, प्रदीप कळम, विजय भोईटे, विजू भोसले, विनायक ताकभाते, लक्ष्मण महाडिक, माऊली बजरंगी, बाबा बनसोडे, देविदास घुले, सचिन स्वामी, अजय सौंदळे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांनी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या शौर्य, त्याग आणि राष्ट्रनिष्ठ कायार्ला अभिवादन करत त्यांच्या विचारांचे स्मरण केले. कार्यक्रमात शिवभक्तांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदविला.

# केंद्रीय रस्ते व वाहतूक मार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** केंद्रीय रस्ते व वाहतूक मार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी श्रींची मूर्ती व उपरणे देऊन त्यांचा सन्मान केला.

यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार समाधान आवताडे, आमदार अभिजीत पाटील, नगराध्यक्षा प्रणिता भालके, माजी आमदार प्रशांत परिचारक,तसेच मंदिर समितीच्या सदस्या शकुंतला नडगिरे, संभाजी शिंदे, ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके व व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

# समाज कल्याण सभापती संस्कृती सातपुते यांचा पहिलाच 'जनता दरबार' संपन्न



**माळशिरस (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण सभापती संस्कृती सातपुते यांनी आपल्या दहीगाव जिल्हा परिषद गटात बुधवार 13 मे रोजी आयोजित केलेल्या पहिल्याच 'जनता दरबाराला' नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. माळशिरस तालुक्यातील या पहिल्याच जनसंवाद उपक्रमाला ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती, ज्यामध्ये अनेक प्रलंबित प्रश्नांवर थेट चर्चा करण्यात आली.

पदभार स्वीकारल्यानंतर आपल्या कार्यक्षेत्रातील नागरिकांच्या अडीअडचणी जाणून घेण्यासाठी सभापती संस्कृती सातपुते यांनी या जनता दरबाराचे आयोजन केले होते. "प्रशासकीय कामात पारदर्शकता आणणे आणि शेवटच्या घटकापर्यंत शासकीय योजना पोहोचवणे" हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

जनता दरबारामध्ये यावेळी खालील विषयांवर चर्चा करण्यात आली:

वैयक्तिक लाभाच्या योजना, दलित वस्ती सुधार योजना आणि मागासवर्गीय लाभार्थ्यांसाठीच्या उपक्रमांची माहिती देण्यात आली.

रस्ते, पाणी आणि वीज यांसारख्या पायाभूत सुविधांबाबत ग्रामस्थांनी आपल्या तक्रारी मांडल्या.

सभापतींनी तक्रारदारांचे म्हणणे ऐकून घेऊन संबंधित विभागाच्या अधिकार्यांना तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

दहीगाव जि प गटातील हा सभापतींचा पहिलाच मोठा सार्वजनिक कार्यक्रम असल्याने सकाळपासूनच विविध गावांमधून नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिला आणि ज्येष्ठांची संख्या लक्षणीय होती. लोकप्रतिनिधी स्वतः गावात येऊन प्रश्न सोडवत असल्याबद्दल दहीगाव परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

यावेळी स्थानिक पदाधिकारी, शासकीय अधिकारी आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. या यशस्वी जनता दरबारामुळे आगामी काळात तालुक्यातील विकासाला अधिक गती मिळण्याची चिन्हे दिसत आहेत.

# महापालिकेच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज यांना अभिवादन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने श्री छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त जुना पुना नाका येथील श्री छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास तसेच कौन्सिल हॉल येथील महापौर कार्यालयातील श्री छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.याप्रसंगी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, नगरसेवक बिजू प्रधाने, नगरसेवक विनोद भोसले, नगरसेविका श्रीदेवी फुलारी, नगरसेविका संगीता जाधव, नगरसेविका श्रद्धा पवार, नगरसेविका कल्पना कदम, माजी नगरसेवक गुरुशांत धुत्तरगावकर, महेश देवकर, किरण पवार, शाहू सलगर, कामगार कल्याण अधिकारी तथा जनसंपर्क अधिकारी अजितकुमार खानसोळे आकाश जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.